
दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.६ जानेवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १३३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 6 January 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 133 ● Pages 4 ● Rate 4 Rs




## 'फ्लड डायव्हर्शन'चा पहिला टप्पा लवकरच

# शहरांना पुरापासून मिळणार संरक्षण अन् दुष्काळी भागाला पाणी-मुख्यमंत्री फडणवीस

### फ्लड डायव्हर्शनचा पहिला टप्पा लवकरच

मुख्यमंत्री म्हणाले, सांगली व कोल्हापुरात आलेल्या महापुरात अमाप नुकसान झाले. त्यानंतर आम्ही फ्लड डायव्हर्शनचा पहिला प्रोजेक्ट राबवण्याचा निर्णय घेतला. २ टप्प्यांत होणाऱ्या या प्रकल्पावर ४ हजार कोटींचा खर्च होणार आहे. त्याचा सांगलीतील पहिला पहिला टप्पा लवकरच सुरू होणार आहे. त्यासाठी ५९१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे पुराचे पाणी शहरात न येता पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळी भागात वळवण्यात येईल. यामुळे एकीकडे आपल्या शहरांना पुराच्या पाण्यामुळे संरक्षण मिळेल आणि दुसरीकडे दुष्काळी भागाला त्या पाण्यामुळे शेतकऱ्याला जिवनदान मिळेल.आपल्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले. याबाबतीत आपण दुसऱ्या क्रमांकावर आहोत. आज महाराष्ट्रातील ५० टक्के लोकसंख्या शहरात राहते. ६ कोटी लोकं ४० हजार गावांत राहतात आणि ६ कोटी लोकं ४०० शहरांत राहतात. ६ कोटींपैकी साडेचार कोटी लोकं सांगलीसारख्या २९ शहरांत राहतात. त्यामुळे शहरांत राहणाऱ्या लोकांच्या जिवनात सकारात्मक बदल घडवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.



**सांगली | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगलीत भाजपच्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी त्यांनी सांगली व कोल्हापूर सारख्या शहरांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी फ्लड डायव्हर्शन प्रकल्पाचा पहिला टप्पा लवकरच सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले. फ्लड डायव्हर्शन प्रकल्पामुळे सांगली व कोल्हापूर सारख्या शहरांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण होईल. हे पाणी पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळी भागाकडे वळवले जाईल. यामुळे एकीकडे आपल्या शहरांना पुराच्या पाण्यामुळे संरक्षण मिळेल आणि दुसरीकडे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना जिवनदान मिळेल, असे ते म्हणाले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आहे. त्या निमित्ताने मी सांगलीतून भाजपच्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी एकदा सांगलीत आले होते. तेव्हा ते म्हणाले होते, सांगली सर्वात चांगली. त्यामुळे मी ठरवले की, महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ मुंबईत सायंकाळी होईल. पण तत्पूर्वी, सांगलीतून भाजपच्या प्रचाराचा शुभारंभ करण्याचा निर्णय आम्ही घेतला. मागच्या महापालिका निवडणुकीत मी सांगलीत आलो होतो. तेव्हा काही आश्वासने दिली होती. तसेच जनतेला भाजपच्या ताब्यात महापालिका सोपवण्याचे आवाहनही केले होते. त्यानंतर महापालिकेची सूत्रे भाजपच्या हातात आली. त्यानंतर आम्ही दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.फडणवीस पुढे म्हणाले, मागील ७० वर्षांत गावांचा विकास म्हणजे देशाचा विकास ही भूमिका मांडण्यात आली. ही भूमिका चूक नव्हती. पण ही भूमिका मांडताना आपण भारतात शहरेही आहेत याचा विसरलो. शहरांतही लोकं राहतात. त्यांच्यासाठीही मुलभूत सोयीसुविधा केल्या पाहिजेत. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगार यासाठी गावातील लोक शहरात येत आहेत. यामुळे शहरांच्या गरजा वाढत आहेत. शहरात लोक आले की, त्यांना राहण्यासाठी जागा मिळत नाही. त्यातून अतिक्रमणे होतात. झोपडपट्ट्या तयार होतात. लोक जागा मिळेल त्या ठिकाणी बसतात. पिण्याच्या पाण्याचे प्रश्न निर्माण होतात. घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाचे प्रश्न निर्माण होतात.पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे ७० वर्षे आपण शहरांसाठी काहीच केले नाही. पण देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सरकार आल्यानंतर शहरीकरणाला अभिशाप न समजण्याचे निर्देश दिले. शहरांमध्ये व्यवस्था उभ्या करण्याचा सल्ला दिला. देशाचा ६५ टक्के जीडीपी शहरात तयार होतो. वस्तु व सेवांची निर्मिती, रोजगारांची निर्मिती ही शहरात होते. त्यामुळे शहरातील मध्यमवर्गीय व गरिबांचे जीवनमान उंचावेल अशा व्यवस्था निर्माण केल्या तर आपली शहरे हीच पुढच्या काळात विकासाचे केंद्र बनतील. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी पहिल्यांदा देशात शहराच्या विकासासाठी योजना उभ्या केल्या. त्यासाठी पैसे देणे सुरू केले. त्यातून शहरांना लाखो कोटींचा निधी उपलब्ध होण्यास सुरुवात झाली.एकट्या महाराष्ट्राला ३० ते ३५ हजार कोटी रुपये दिले. त्यातून पिण्याचे पाणी, भुयारी गटार, कचऱ्याचे व्यवस्थापन आदी विविध योजना अंमलात आणल्या गेल्या. यामुळे महाराष्ट्रातील शहरे बदलू लागली, असे फडणवीस म्हणाले.


# डॉ भदंत आनंद कौसल्यायन महाथेरो यांची जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

जागतिक कीर्तीचे बौद्ध धर्मगुरू डॉ भदंत आनंद कौसल्यायन महाथेरो यांची १२१ वी जयंती प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने महाविहार धम्मभूमी,शिवणी येथे साजरी करण्यात आली.

यावेळी भिक्खु धम्मशील यांनी भंतेजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.ते पुढे बोलताना म्हणाले की डॉ.भदंत आनंद कौसल्यायन यांचे पाली साहित्यात अत्यंत महत्वाचे योगदान होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर संपूर्ण देशामध्ये बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार भंतेजिनी केला. पाली साहित्य आणि बौद्ध वांग्मयावर अनेक ग्रंथ त्यांनी लिहून त्यांनी बौद्ध धम्माच्या पुनर्जीवनासाठी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीला पुढे घेऊन जाण्यासाठी




अत्यंत महत्वाचे योगदान दिले आहे .२२ मे १९७७ रोजी आदरणीय भंतेजी हे बीडला आले होते. त्यांच्या हस्तेबीड तालुक्यातील शिवणी येथे दोन दिवशीय धम्मदीक्षा सोहळा संपन्न झाला होता आणि त्याच वेळी त्यांच्या हस्ते एका बोधिवृक्षाचे रोपण ही करण्यात आले होते. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने शिवणी येथे सहा एक्कर जमीन घेऊन त्या परिसराला डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर असे नाव देण्यात आले असून दरवर्षी भंतेजींची जयंती साजरी करण्यात येत असते. यावेळी पु. भिक्खु धम्मशील थेरो, पु. भंते बुद्धबोधी, इंजि. वसंत तरकसे, भास्कर सरपते, अंकुश नाना डोळस, परमेश्वर विद्यागर, सनी वाघमारे, पंचशीला सरपते आदींची उपस्थिती होती.

## माहेराहून घर बांधण्या साठी १५ लाख रुपये आण म्हणून उपाशी ठेवून, विवाहितेस बाळा सह घराबाहेर हाकलले

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

माहेराहून घर बांधण्या साठी १५ लाख रुपये घेवून ये म्हणुन सासरच्या मंडळींनी उपाशी ठेवून, मारहाण करून बाळासह घराबाहेर हाकलून दिल्या प्रकरणी सासू,सासऱ्या सह पती विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गून्हा नोंद झाला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की,दहिफळ वडमाऊली येथील शितल चा विवाह तीन वर्षांपूर्वी धाराशिव जिल्ह्यातील वडजी येथील अजय रामेश्वर जाधवर यांच्या सोबत हिंदू रितिरिवाजा प्रमाणे झाला होता.लग्नानंतर एक वर्षे सासरच्यांनी शितलला चांगले सांभाळले.परंतु पती अजय जाधवरला ऑन लाईन गेम ची सवय लागल्यामुळे त्याच्यावर मोठ्या प्रमाणात खाजगी सावकारांचे कर्ज झाले. त्या कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी सासरच्यांनी सारखाच तगादा लावल्या मुळे दिड महिन्यापूर्वीच शितलच्या आई वडिलांनी त्यांची जमीन विकून तीन लाख रुपये दिले होते. परंतु त्यानंतरही




पती अजय जाधवर हा पत्नी शितलला कॉल करून खाजगी सावकारांना कॉल वर बोलण्यासाठी जबरदस्ती करीत होता, नाही बोललीस तर बाळा सह तुला जीवे मारून टाकीन म्हणुन धमकी देत होता.माहेराहून १५ लाख रुपये घेवून घरी ये म्हणुन शीतलला उपाशी ठेवून, शिवीगाळ करून,लाथा, बुक्कयानी मारहाण करून दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी घराबाहेर हाकलून दिले.व शारीरिक आणि मानसिक छळ केला म्हणुन शितल अजय जाधवर रा.वडजी जि. धाराशिव ह.मू.दहिफळ वडमाऊली यांच्या फिर्यादी वरून अजय रामेश्वर जाधवर पती, रामेश्वर अर्जुन जाधवर सासरा,व रमा रामेश्वर जाधवर सासू या तिघां विरुद्ध केज पोलिसात शारीरिक व मानसिक छळ करून मारहाण करून बाळासह घरा बाहेर हाकलून दिले म्हणुन केज पोलिस ठाण्यात गून्हा नोंद झाला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला जमादार पल्लवी तरकसे या पुढील तपास करीत आहेत.

## लहुजी साळवे यांच्या क्रांतिकारी योगदानावर प्रकाश केज मध्ये महात्मा फुले,सावित्रीबाई फुले,मुक्ता साळवे जयंती निमित्त जाहीर परिसंवाद उत्साहात संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

लहुजी क्रांती मोर्चा, लसाकम व बीसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,महात्मा ज्योतीराव फुले व क्रांतीज्योती मुक्ता साळवे यांच्या जयंती निमित्त आयोजित जाहीर परिसंवाद केज येथील पंचायत समिती सभागृहात उत्साहात संपन्न झाला.महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत लहुजी साळवे यांचे योगदान व परिणाम या विषयावर प्रा.विकास पाथ्रीकर यांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी एच.पी.कांबळे सर होते.यावेळी सौ. शितलताई लांडगे यांना संघर्षनायिका राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड,अड. दीपक साठे,एस.एम. जोगदंड,दत्ता माने, सुनिल वैरागे,भास्कर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रमेश पाटोळे यांनी केले तर आभार कांबळे सर यांनी मानले.नागरिक व तरुणांची मोठी उपस्थिती लाभलेल्या या परिसंवादातून फुले, सावित्री,मुक्ता व लहुजी साळवे यांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

## माजलगावात खा.बजरंग बप्पा सोनवणे, आ. प्रकाशदादा सोळंके,डॉ.ओमप्रकाश शेटे व बाबुराव पोटभरे या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये होणार पत्रकार संघाच्या पुरस्काराचे वितरण

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव | प्रतिनिधी**

माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने माजलगाव येथे खा. बजरंग बप्पा सोनवणे, आ. प्रकाशदादा सोळंके, डॉ. ओमप्रकाश शेटे व बाबुराव पोटभरे या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये दि.६ मंगळवारी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात पत्रकार संघाच्या वतीने विवीध पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे तर याच कार्यक्रमात माजलगाव नगरीच्या नुतन नगराध्यक्षा महरीन शिफा बिलाल चाउस यांचाही सत्कार माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने करण्यात येणार आहे.

यंदाचा दर्पण पुरस्कार हा जेष्ठ पत्रकार सुधाकर बळीरामपंत देशमुख, माजलगाव भुषण पुरस्कार छत्रपती कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप, समाज भुषण पुरस्कार माजलगाव विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा सौ. मंगला प्रकाश सोळंके यांना तर यशस्वी उद्योजक म्हणुन शहरातील प्रतिष्ठीत



उद्योजक शेख सत्तार यांचा सन्मान करण्यात येणार आहे. माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी दर्पण पुरस्कारासह विवीध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-यांचा विशेष गौरव करण्यात येतो. यावर्षीही विवीध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असुन जेष्ठ पत्रकार सुधाकर बळीरामपंत देशमुख, माजलगाव भुषण पुरस्कार छत्रपती कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप, समाज भुषण पुरस्कार व सन्मान नारीशक्तीचा या उपक्रमात माजलगाव विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई प्रकाश सोळंके यांना तर यशस्वी उद्योजक म्हणुन शहरातील प्रतिष्ठीत उद्योजक शेख सत्तार यांचा सन्मान विवीध मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दि. ६ जानेवारीला होणा-या दर्पण पुरस्कारासह विवीध पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी जेष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर हे तर आयुष्यमान भारतचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, नगराध्यक्षा शिफा बिलाल चाउस, मा. आ. मोहनराव सोळंके, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, मा. आ. डि. के. देशमुख, बाबुराव पोटभरे, अशोक डक, प्रा. मिलींद आवाड, जयसिंग सोळंके, सभापती जयदत्त नरवडे, नितीन नाईकनवरे, भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसिलदार संतोष रूईकर, पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास माजलगावकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, जेष्ठ पत्रकार महेंद्र मस्के, सचिव दिनकर शिंदे, कार्याध्यक्ष कमलेश जाब्रस, दत्ता येवले, जेष्ठ पत्रकार संतोष मुळी यांचेसह माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

**नुतन नगराध्यक्षांचा होणार सत्कार**

माजलगाव नगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत विजय मिळविलेल्या नुतन नगराध्यक्षा महरीन शिफा बिलाल चाउस यांचा माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने याच कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

# संपादकीय

## लोकोत्तर समाजधुरीण

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, लोकोत्तर समाजधुरीण, बहुभाषाकोविद, भारतीय इतिहास संशोधनाचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांनी प्रकाशित केलेल्या दर्पण या मराठी वृत्तपत्राचा स्थापना दिन ६ जानेवारी हा 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने जांभेकर यांच्या कार्याचे पुण्यस्मरण...आ चार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म हा देवगड तालुक्यातील पोंभुर्ले येथे २० फेब्रुवारी, १८१२ रोजी झाला. जांभेकर घराणे मूळचे गोव्याचे असून तेथील पोर्तुगीज राजवटीला कंटाळून शेजारच्या कोकणात आले. ऋग्वेदी कौशिक गोत्री, कऱ्हाडे ब्राह्मण असून ते 'भट' शाखेचे होते. गोव्यातील म्हाळसादेवी हे त्यांचे कुलदैवत. त्यांचे घराणे ग्रामोपाध्ये असून एक प्रमुख मानकरी आहेत. गंगाधरशास्त्री व सगुणाबाई या दाम्पत्याच्यापोटी दुसरे अपत्य म्हणून बाळकृष्ण यांचा जन्म झाला. मराठी व संस्कृत भाषेवर प्रभुत्व असल्याने बाळबोध, गीतपाठ, वेदपठण, अमरकोश, लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा अभ्यास केल्याने ते 'बालबृहस्पती' या नावानेही ओळखले जायचे. मराठी व संस्कृत शिवाय अनेक देशीविदेशी भाषांची उत्तम जाण त्यांना होती. परिणामी १८२५च्या सुमारास त्यांनी मुंबईत येऊन इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला. विद्यार्थीदशेतच त्यांनी गणिती परिभाषा व्याकरण, ज्योतिषशास्त्र, इतिहास व भूगोल आदींवर मराठीत ग्रंथनिर्मितीचे महान कार्य करण्याची किमया त्यांनी अवघ्या १७व्या वर्षी पार पाडून डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी व शाळा तपासणीस म्हणून नोकरी केली. भारतीय इतिहास संशोधनाचे जनक म्हणून परिचित असताना अक्कलकोट येथील संस्थानात युवराजांचे गुरू, एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये सहाय्यक प्राध्यापक व कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणून कामगिरी बजावली. त्याचबरोबर रॉयल एशियाटिक सोसायटी व इंग्लंडमधील भौगोलिक संस्थेच्या नैपुण्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला होता. न्या. चंदावरकर यांनी त्यांचा 'आद्यऋषी' असा गौरव केला होता. सामाजिक विचारमंथन करण्याच्यादृष्टीने त्यांनी प्रथम इंग्रजी दैनिक 'बॉम्बे दर्पण' सुरू केल्यानंतर शुक्रवार दि. ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' या मराठीतील पहिल्या वृत्तपत्राची स्थापना करून मराठी वृत्तपत्र सृष्टीची मुहूर्तमेढ रोवली. म्हणूनच त्यांना मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक असे म्हटले जाते. त्याचे मालक व संपादक ते स्वतःच होते. विसाव्या वर्षीच हे धाडस करून मराठी पत्रकारितेचा पाया घालणारे ते आद्यपत्रकार ठरले. याची आठवण म्हणून ६ जानेवारी हा दिवस राज्यभर 'पत्रकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. समाजसुधारक म्हणून भूमिका पार पाडताना त्यांनी लोकांना पाश्चात्त्य ज्ञान, विद्या देत समृद्धी व लोकशिक्षणाच्या माध्यमातून लोकरंजन करण्याचे दर्पणच्या पहिल्याच अंकातून सूतोवाच केले होते. या कामी त्यांना बराच आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला. दुर्दैवाने अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले दर्जेदार वृत्तपत्र १ जुलै १८४० रोजी बंद करणे भाग पडले.सरकारी नोकरी सांभाळून देशातील चळवळींना हातभार लावताना कुणाचेही मिंधेपणा त्यांनी स्वीकारला नाही. म्हणूनच त्यांना अष्टावधानी व बुद्धिवंतांचे अग्रदूत तसेच ज्ञाननिष्ठ समाजधुरीण म्हटले जाते. राजा राममोहन रॉय यांच्या कार्याने प्रभावित होऊन त्यांनी विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण तसेच दुष्ट रूढी, परंपरा व अज्ञान याविषयी समाजप्रबोधन केले. त्याचवेळी सरकारने धार्मिक शिक्षणामध्ये कोणताही हस्तक्षेप न करता तटस्थ राहावे असा आग्रह धरला. वाचकांच्या टीकेला, विरोधी मताला सन्मानाचे स्थान देण्याची संस्कृती त्यांनी जोपासली. ते हिंदू धर्माभिमानी व सुधारणावादी तर होतेच तसेच शिक्षण हेच प्रगतीचे साधन म्हणून ओळखणारे ते पहिले लोकोत्तर पुरुष होते. आज काही वृत्तपत्रांनी वाचक पत्रांचे स्तंभ मात्र बंद केले याची खंत वाटते. वृत्तपत्र हे समाजाच्या जाणिवेचे संस्कारण करणारे प्रभावी साधन व माध्यम असल्याने पत्रकार हा सुबुद्ध, व्यासंगी, शीलवान व समाजहितैशी असावा असा त्यांचा प्रामाणिक आग्रह असे. संपादकांच्या चुका सदभावाने दाखवण्याची परंपरा ही दर्पणनेच घालून दिली. १९४० मध्ये त्यांनी 'दिग्दर्शन' नावाचे मासिक सुद्धा सुरू केले होते. त्यांच्या ह्याच कार्याची दखल घेत सरकारने त्यांना जे.पी. ही मानाची पदवी देऊन गौरवले. बाळशास्त्री यांनी प्रामुख्याने नितीकथा, सारसंग्रह, इंग्लंडची बखर, बाल व्याकरण, भूगोलशास्त्र, शब्दसिद्धी-निबंध, समीकरण विषयांवर टिपणे, हिंदुस्थानचा इतिहास, गणित, मानव शास्त्र, हिंदुस्थानातील ब्रिटिशांचा इतिहास आदी ग्रंथ लिहिले. संशोधक म्हणून प्राचीन लिप्यांचा अभ्यास करताना कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांवर शोधनिबंध, ज्ञानेश्वरी काव्य ग्रंथाचे प्रकाशन व इंग्रजी-मराठी धातुकोशही लिहिला.१८४५ मध्ये 'नेटिव्ह इंपृव्हमेंट सोसायटी' व बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररी यांची स्थापना केली. ध्येयसक्ती पोटी केलेल्या अतिश्रमांमुळे अलिबाग येथे त्यांना विषमज्वराची लागण झाली. त्यानंतर उपचारासाठी मुंबईत आल्यावर १८ मे १८४६ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या जन्मगावी पोंभुर्ले येथे त्यांचे छोटेसे स्मारक आहे. आज लोकशाहीचा चौथा स्तंभ मात्र काहीसा डळमळीत झाल्याचे दुर्दैवाने म्हणावे लागते. त्यामुळे पत्रकारांनी आपली भूमिका अगदी निर्भीडपणे बजावणे क्रमप्राप्त आहे. तरच बाळशास्त्रींचा वारसा पुढे सुरू राहील. तसेच मराठीला आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने तो घसरणार नाही याची दक्षता घेणेही गरजेचे आहे. अनेक वर्षे पाठपुरावा केल्यानंतर मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात त्यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले आहे. कारण तिथेच जांभेकर यांनी प्राध्यापक म्हणून नोकरी केली होती. त्यांच्या जन्मभूमीत ओरोस(सिंधुदुर्ग)येथे त्यांच्या नावे भव्य स्मारक तथा 'पत्रकार भवन' बांधण्यात आले आहे. चार वर्षांपूर्वी राज्य सरकारने त्यांचा थोर राष्ट्रपुरुष अभिवादन यादीत समावेश करून त्यांना अभिवादन करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत; परंतु अद्यापही एशियाटिक लायब्ररीत मात्र त्यांचे तैलचित्र न लावल्याबद्दल खेद वाटतो. तसेच शासनाने त्यांच्यावर अभ्यासक्रमात धडा समाविष्ट करून 'पत्रकार विद्यापीठ' स्थापन करावे अशीही मागणी आता पुढे येत आहे. अशा या थोर आद्य पत्रकारास कोकणवासीयांतर्फे मानाचा मुजरा!

# लोकप्रिय शेफने सांगितली पदार्थ उकळण्याची परिपूर्ण पद्धत

**दैनिक राज आनंद । वृत्तसेवा**

स्वयंपाक करणं ही केवळ गरज नाही तर एक कला देखील आहे. योग्य मीठ, मसाले इत्यादी गोष्टींटी माहिती असणं अत्यंत महत्त्वाचं आहे. कधीकधी, अन्न जास्त मीठयुक्त असतं, तर कधीकधी ते जास्त मसालेदार असते. तर कधी बटाटे आणि अंडी उकडताना ती फुटतात यामुळे वेळ तर वाया जातोच, पण स्वयंपाक करण्याचा तुमचा मूडही खराब होतो. जर तुम्हाला वारंवार अशा समस्या येत असतील तर काही महत्त्वाच्या टीप्स जाणून घ्या. शेफ पकंज भदौरिया यांनी काही महत्त्वाच्या टीप्स दिल्या आहेत हे तुम्हाला उकडलेल्या अंडीपासून ते बटाटे आणि नूडल्सपर्यंत सर्व काही शिजवण्याची योग्य पद्धत सांगतील, जेवणाची चव खराब न करता किंवा तुमचा मूड खराब न करता. सर्वकाही शिजवण्याची आणि उकळण्याची योग्य पद्धत जाणून घ्या

**बटाटे शिजवताना हे लक्षात ठेवा**

बटाटे उकळण्यासाठी कोणत्या प्रकारचे पाणी वापरावे? त्यांच्या मते, बटाटे उकळण्यासाठी





तुम्ही नेहमी सामान्य किंवा थंड पाणी वापरावं. कारण बटाटे गरम किंवा कोमट पाण्यात उकळल्याने ते बाहेरून शिजतात पण आतून कच्चे राहतात.

**या टिपमुळे अंडी नाही फुटणार**

बऱ्याचदा, अंडी फोडतात किंवा उकळताना बलक बाहेर येतो. शेफ सांगतात, पाण्याचं तापमान अचानक बदलल्यामुळे असं होते. म्हणून, अंडी उकळण्यासाठी, तुम्ही प्रथम त्यांना थंड पाण्यात भिजवावे आणि नंतर ते चुलीवर ठेवावे. यामुळे अंड्यांची कवच पाण्याच्या तापमानाबरोबर हळूहळू गरम होऊ शकतील, ज्यामुळे अंडी उकळताना फुटणार नाही.

**पास्ता किंवा नूडल्स उकळवण्याची योग्य पद्धत**

शेफ सांगतात की, पास्ता, मॅकरोनी किंवा नूडल्स शिजवण्यासाठी नेहमी उकळत्या पाण्याचा वापर करावा. यामुळे पास्ता आणि नूडल्स एकमेकांना चिकटत नाहीत. पण, जर तुम्ही ते थंड पाण्यात टाकले तर पाण्यातील स्टार्च त्यांना एकत्र चिकटण्यास कारणीभूत ठरतील. हे टाळण्यासाठी, पास्ता उकळताना नेहमी मीठ आणि थोडे तेल घाला.

**हिरव्या भाज्या कशा उकळायच्या?**

हिरव्या भाज्यांमध्ये भरपूर पोषक तत्वे असतात. म्हणून, त्या उकळताना त्यांचा रंग आणि पोषण नष्ट होणार नाही याची खात्री करणं महत्वाचं आहे. शेफ पंकज सल्ला देतात की हिरव्या भाज्या नेहमी पाणी गरम झाल्यानंतरच उकळवायच्या. साध्या पाण्यात भाज्या भिजवल्याने त्यांचा रंग जाऊ शकतो. शेफ सल्ला देतात की, भाज्या उकळल्यानंतर लगेच थंड पाण्यात टाका. यामुळे त्यांचा नैसर्गिक रंग टिकून राहील.

# घरातील आर्थिक चणचण दूर करण्यासाठी मनी प्लांटला 'या' ठिकाणी ठेवा

**दैनिक राज आनंद । वृत्तसेवा**

वास्तुशास्त्रानुसार मनी प्लांट घरामध्ये ठेवणे अत्यंत शुभ मानले जाते. मनी प्लांट हा हिरवागार, सदाहरित व दुर्गंधी शोषून घेणारा वनस्पती प्रकार आहे. त्याच्या पानांची रचना हृदयाकृती असल्याने हा प्रेम, शांतता आणि सौहार्दाचे प्रतीक मानला जातो. वास्तुशास्त्रात सांगितले आहे की मनी प्लांट घरातील नकारात्मक ऊर्जा कमी करून सकारात्मक ऊर्जा वाढवतो. तसेच, हा वातावरणातील कार्बन डायऑक्साईड कमी करून घरातील हवा शुद्ध ठेवण्यास मदत करतो. विशेषतः आर्थिक प्रगती, सौख्य व समृद्धी यासाठी मनी प्लांट फायदेशीर ठरतो. म्हणूनच मनी प्लांटला 'मनी' म्हणजेच धनाशी जोडलेले वनस्पती समजले जाते. वास्तुशास्त्रानुसार मनी प्लांट ठेवताना त्याची दिशा फार महत्त्वाची आहे. घरातील आग्नेय दिशा म्हणजेच दक्षिण-पूर्व दिशेत मनी प्लांट ठेवणे शुभ मानले जाते, कारण ही दिशा धन व आर्थिक प्रगतीशी निगडित आहे.

या दिशेत ठेवलेल्या मनी प्लांटमुळे धनप्राप्तीच्या संधी वाढतात आणि व्यवसायात प्रगती होते असे मानले जाते. तसेच उत्तर दिशा किंवा पूर्व दिशेत मनी प्लांट ठेवणे शुभ फळ देणारे असते. मात्र उत्तर-पश्चिम दिशेत किंवा घराबाहेर सूर्यप्रकाशात थेट ठेवणे टाळावे, कारण त्यामुळे त्याची वाढ खुंटू शकते आणि वास्तुदृष्ट्या ते प्रतिकूल परिणाम देऊ शकते. मनी प्लांट पाण्यात किंवा मातीमध्ये



ठेवता येतो, पण पाण्याची स्वच्छता आणि त्याचे योग्य पोषण याची काळजी घेणे आवश्यक आहे. घरात मनी प्लांट ठेवताना त्याची व्यवस्थित निगा राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सुकलेली पाने, घाण किंवा दुर्लक्षित झालेला मनी प्लांट नकारात्मक ऊर्जा निर्माण करू शकतो. म्हणून वेळोवेळी पानांची स्वच्छता करणे, झाडाची छाटणी करणे आवश्यक आहे. मनी प्लांटचा तुकडा घेऊन इतरांना देणे समृद्धी वाटण्याचे सूचक मानले जाते, पण दुसऱ्याकडून मनी प्लांट मागून घेणे टाळावे असेही वास्तुशास्त्र सांगते. एकूणच पाहता, मनी प्लांट घरामध्ये ठेवल्याने आरोग्य, आनंद, सौहार्द आणि आर्थिक समृद्धी यांची वाढ होते. म्हणूनच वास्तुशास्त्रात मनी प्लांटला विशेष महत्त्व दिले जाते आणि तो घरासाठी शुभवर्धक वनस्पती म्हणून ओळखला जातो. वास्तुशास्त्रात वनस्पतींचे विशेष महत्त्व सांगितले आहे. घरात झाडे-झुडपे लावली जातात. वास्तुशास्त्रानुसार, घरात काही रोपे लावल्याने जीवनात सकारात्मक बदल होतात. मनी प्लांटबद्दल सगळ्यांनाच माहिती आहे. ही वनस्पती वास्तुच्या दृष्टीने खूप शुभ मानली जाते. घरात योग्य दिशेने हे रोप लावल्याने संपत्ती येते. मात्र, आणखी एक वनस्पती आहे, जी मनी प्लांटपेक्षा अधिक शुभ मानली जाते. चला तर मग जाणून घेऊया या वनस्पतीचे नाव. तसेच ते घरात लावण्याचे फायदे जाणून घ्या.

या वनस्पतीचे नाव क्रसुला वनस्पती आहे. ह्याला मनी प्लांटच्या श्रेणीतही ठेवण्यात आले आहे. चिनी वास्तुशास्त्र म्हणजेच फेंगशुईमध्ये ते मनी प्लांटपेक्षा अधिक प्रभावी मानले जाते. घरात क्रासुला रोप लावल्याने हळूहळू आर्थिक चणचण कमी होते. या प्रकल्पामुळे उत्पन्नाचे नवे मार्ग खुले होण्यास मदत होते. घरात सकारात्मक ऊर्जा वाढते. घराची भरभराट होते. जर खिसा रिकामा असेल तर हे रोप घरात लावणे खूप फायदेशीर ठरू शकते. वास्तुशास्त्रानुसार, घरात क्रसुला प्लांट लावल्याने केवळ नोकरी आणि व्यवसायालाच फायदा होत नाही, तर हा प्लांट घरातील उर्जा संतुलनही राखतो. व्यावसायिकांसाठी हे विशेष शुभ आहे. घराच्या मुख्य दरवाजाच्या उजव्या बाजूला क्रासुला रोप ठेवावे. वास्तुच्या मान्यतेनुसार असे केल्याने घरात पैसे येण्याची शक्यता वाढते. या झाडाला जास्त पाणी देण्याची गरज नसते. फक्त ह्याची पाने वेळोवेळी स्वच्छ केली पाहिजेत. या झाडाला पुरेसा सूर्यप्रकाश द्यावा. वास्तुशास्त्राच्या मान्यतेनुसार, घरात वनस्पतींचे अस्तित्व वातावरण स्वच्छ ठेवते. त्याचबरोबर मानसिक संतुलन राखले जाते.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांची व्यापकता वाढविणे काळाची गरज-पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक वादळ वार्ता**
**शिर्डी । प्रतिनिधी**

देशात औद्योगिक गुंतवणुकीला मोठे प्रोत्साहन मिळत असून, उद्योगांना आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी आपल्या अभ्यासक्रमांची व्यापकता वाढविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.राहाता येथील लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या 'साईबाबा रूरल इन्स्टिट्यूट'मधील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस श्री.विखे पाटील यांनी भेट दिली. यावेळी विविध विभागांची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, सध्या राज्यात सौर ऊर्जा प्रकल्पांना विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. 'सौर ग्राम' प्रकल्पांची वाढती संख्या आणि



या क्षेत्राचा वेग पाहता, भविष्यात मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळाची गरज भासणार आहे. ही गरज ओळखून संस्थांनी त्यापद्धतीचे अभ्यासक्रम तयार करावेत. तसेच, यामध्ये विद्यार्थिनींनाही प्रशिक्षणासाठी प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी संस्था चालकांना दिल्या.राज्यशासनाने कौशल्य विकासाला गती दिली असून, 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास' योजनेसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. प्रवरा शिक्षण संस्थेने या योजनेत पुढाकार घेतल्याने अनेक विद्यार्थ्यांना नामवंत कंपन्यांमध्ये नोकरीच्या (प्लेसमेंट) संधी उपलब्ध झाल्याबद्दल श्री.विखे पाटील यांनी समाधान व्यक्त केले.जिल्ह्यातील औद्योगिक विकासाविषयी माहिती देताना ते म्हणाले , शिर्डी औद्योगिक वसाहतीमध्ये (MIDC) नवीन उद्योग सुरू होत असून, यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. तसेच, औद्योगिक विकासासाठी राहुरी कृषी विद्यापीठाची जागा उपलब्ध करून घेण्याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.शिवकालीन तोफेच्या प्रतिकृतीचे कौतुक : या भेटीदरम्यान, संस्थेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शिवकालीन तोफेच्या प्रतिकृतीची आणि त्याच्या प्रात्यक्षिकाची पालकमंत्र्यांनी पाहणी केली. बिबट्यांच्या वावरामुळे निर्माण होणाऱ्या समस्येवर उपाय म्हणून, बिबट्यांना हुसकावून लावण्यासाठी हे उपकरण अत्यंत उपयुक्त ठरेल, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे विशेष कौतुक केले.

# हिवाळ्यात नारळ पाणी प्यावे की नाही?

**दैनिक वादळ वार्ता**

नारळ पाणी पिणे आपल्या आरोग्यासाठी खूप प्रभावी मानले जाते. हे शरीराला ताकद देण्यात आणि हायड्रेट ठेवण्यात मदत करते, ज्यामुळे शरीर निरोगी राहते आणि आजारांपासून दूर राहते. नारळ पाण्यामुळे शरीरातील महत्त्वाच्या अवयवांची कार्यक्षमता वाढते. ते किडणी आणि हृदयाच्या आरोग्यासाठीही फायदेशीर असते. पण अनेकांना असा प्रश्न पडतो की हिवाळ्यात नारळ पाण्याचे सेवन करावे की नाही. कारण नारळ पाणी सामान्यतः उन्हाळ्यातील पेय मानले जाते. उन्हाळ्यात लोक त्याचे भरपूर सेवन करतात. हिवाळ्यात लोक नारळ पाणी पिताना दहा वेळा विचार करतात.

नारळ पाणी आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. ते किडणी, हृदय आणि पचनासाठी प्रभावी मानले जाते. डॉक्टरांच्या मते, हिवाळ्यातही नारळ पाण्याचे सेवन करता येते. हे हिवाळ्यात होणाऱ्या आजारांपासून बचाव करण्यात मदत करू शकते. थंडीच्या हंगामात आजार शरीरावर जास्त प्रभाव टाकतात. पण नारळ पाण्याच्या सेवनाने अनेक फायदे होऊ शकतात. तसेच, हिवाळ्यात त्याचे सेवन करताना काही गोष्टींचे पालन करणे आवश्यक असते.

**हिवाळ्यात नारळ पाणी पिण्याची योग्य वेळ**

हिवाळ्यात नारळ पाण्याचे सेवन करता येते. पण उन्हाळ्याप्रमाणे ते सकाळी पिऊ नये. दुपारच्या वेळी नारळ पाणी पिणे जास्त योग्य मानले जाते. जेव्हा सूर्यप्रकाश बाहेर पडलेला असतो. कारण नारळ पाणी हे थंड असते.

**थंडीत नारळ पाणी कसे प्यावे?**

उन्हाळ्यात लोक नारळ पाणी थंड करण्यासाठी फ्रिजमध्ये ठेवतात. पण हिवाळ्यात असे करणे टाळावे. हिवाळ्यात नारळ पाणी सामान्य तापमानावरच प्यावे. यामुळे खोकला, सर्दी आणि थंडीच्या आजारांचा धोका कमी राहतो.

**हिवाळ्यात हायड्रेशनसाठी नारळ पाणी**

हिवाळ्यात तहान कमी लागते आणि लोक पाण्याचे सेवनही कमी करतात, जे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. नारळ पाणी पोषक तत्त्वांनी आणि इलेक्ट्रोलाइट्सने भरलेले असते. त्याचे सेवन केल्याने शरीर हायड्रेट राहते आणि आवश्यक पोषक तत्त्वेही शरीरापर्यंत पोहोचतात.

**पचन आणि सर्दी-खोकल्यात फायदेशीर**

डॉक्टरांच्या मते, नारळ पाणी शरीराला ताजेतवाने ठेवण्यात मदत करते आणि पचनही सुधारते. जर हिवाळ्यात सामान्य तापमानावर नारळ पाण्याचे सेवन केले तर सर्दी, खोकला आणि पोटाशी संबंधित समस्यांपासून आराम मिळू शकतो.

# परळीत ६ जानेवारीला दर्पण दिन सोहळा रंगणार: आ.धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत डॉ.वि.ल.धारूरकर यांचे व्याख्यान होणार

## दर्पण दिन कार्यक्रमात परळी नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा होणार गौरव



### पत्रकारिता, समाज आणि लोकशाही यांचा आरसा ठरणारा 'दर्पण दिन' : परळीत पुरस्कार वितरण व मान्यवरांची उपस्थिती लाभणार

### पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध स्मृती पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी परळी येथे दर्पण दिन कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे सेवानिवृत्त विभागप्रमुख डॉ. वि. ल. धारूरकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आली आहे.हा कार्यक्रम परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शासकीय विशेष अतिथी विश्रामगृहाच्या सभागृहात सकाळी ११ वाजता सुरू होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व माजी शिक्षण सभापती शंकराप्पा मोगरकर असणार आहेत.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना (शिंदे गट) बीड जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. टी. पी. मुंडे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रदेश सरचिटणीस राजाभाऊ फड, परळी नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, काँग्रेस शहराध्यक्ष बहादूर भाई, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन, नायब तहसीलदार परवीन पठाण, अल्ट्राटेक सिमेंट फॅक्टरीचे जनसंपर्क अधिकारी कुलदीप खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या दर्पण दिन सोहळ्यात नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा सत्कार करण्यात येणार असून, पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध स्मृती पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.



## मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत शासकीय आय.टी.आय कॉलेज परळी वैजनाथ येथे स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम कार्यक्रम संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

दि.५ जानेवारी २०२६ रोजी परळी वैजनाथ येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे शासकीय आय.टी. आय कॉलेज परळी वैजनाथ येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्स च्या माध्यमातून आय.टी.आय च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री.एस. एस.लोखंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज, वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट,कमोडिटी व इक्विटी मध्ये असेल असलेला फरक,डिमॅट अकाउंट,तसेच सेबीच्या सारथी प चे महत्त्व विषद करत मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री. बाळासाहेब नवसुपे सर यांनी विशेष प्रयत्न करत सूत्रसंचालन केले तसेच या कार्यक्रमास शिल्पनिषक व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## स्वामी विवेकानंद शाळे तील विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धांमध्ये नेत्रदीपक यश

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले.तुळजापूर येथील स्वातंत्र्यसंग्राम सेनानी जयवंतराव भानुदासराव धुरगुडे यांच्या १०६ व्या जयंती निमित्त घेण्यात आलेल्या मराठवाडा पातळीवरील सामान्य ज्ञान स्पर्धा,रुक्मीनबाई बजाज कामखेडकर सुगम गायन स्पर्धा रेणापुर,इंटर स्टेट चॅम्पियनशिप कराटे स्पर्धा मध्य प्रदेश,तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन या सर्व स्पर्धेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.त्याबद्दल जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक दत्ता सत्वधर,प्रबोधकांत समुद्रे,धनराज मैंद यांच्या उपस्थितीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचा पालकासह सत्कार करण्यात आला. तुळजापूर येथील स्वातंत्र्य संग्राम सेनानी जयवंतराव भानुदासराव धुरगुडे यांच्या १०६ व्या जयंती निमित्त घेण्यात आलेल्या मराठवाडा पातळीवरील सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये घुले प्रज्ञा दिनकर सर्व प्रथम,यादव हिंदवी विष्णू सर्व तृतीय,गायकवाड ज्ञानदा सुनील सर्व चतुर्थ येण्याचा बहुमान मिळविला.रुक्मीनबाई बजाज काम खेडकर सुगम गायन स्पर्धा रेनापुर या स्पर्धेत देशमुख सुसंस्कृती विनोद हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले,इंटर स्टेट चॅम्पियनशिप कराटे स्पर्धा मध्यप्रदेश यामध्ये मुळे आदर्श हनुमंत याला गोल्ड मेडल मिळाले तसेच तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन यामध्ये विवेकानंद शाळेला सर्व द्वितीय पारितोषिक मिळाले. यातील सहभागी विद्यार्थी बेडस्कर शिवम सुग्रीव, इंगळे कृष्णा ज्ञानेश्वर, नेहरकर रोहित कैलास इत्यादी वरील सर्वयशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे दत्ता सत्वधर, प्रबोधकांत समुद्रे,धनराज मैंद यांचाही याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्र संचलन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी मानले.




## प्रश्न विचारणारे विद्यार्थी घडले,तरच समाज खऱ्या अर्थाने शिक्षित होईल-प्रा.तानाजी ठोंबरे

### सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने व्याख्यान

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण माणसाला शांत बसायला किंवा डोळेझाक करायला शिकवत नाही, तर प्रश्न विचारण्याची आणि विचार करण्याची ताकद देते. जोपर्यंत प्रश्न विचारणारे विद्यार्थी व तरुण घडत नाहीत, तोपर्यंत समाज खऱ्या अर्थाने शिक्षित होणार नाही, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.तानाजी ठोंबरे यांनी केले.तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने शनिवार, दि.३ रोजी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कॉम्रेड नामदेव चव्हाण, प्रा.राम गायकवाड, प्रा.अर्जुन राठोड तसेच डॉ.विजयकुमार बांदल, प्रा.डी.डी. राऊत, प्रा.डी.जी.निकाळजे, सौ. उमा जगतकर उपस्थित होते.

क्रांती या शब्दाबाबत बोलताना प्रा.ठोंबरे म्हणाले की, काळाच्या ओघात हा शब्द गुळगुळीत झाला असून कधी तो प्रवाहात तर कधी व्यवस्थेकडून जाणीवपूर्वक बोथट केला जात आहे. ज्योतिराव फुले आणि सावित्रीमाई फुले हे दोघेही तितकेच क्रांतिकारक होते. त्यांच्या संयुक्त कार्यातूनच समाजपरिवर्तनाची व्यापक चळवळ उभी राहिली. सावित्रीमाईंच्या संघर्षमय जीवनातून आजच्या पिढीने निर्भयपणे प्रश्न विचारण्याची आणि सत्याच्या बाजूने ठाम उभे राहण्याची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

सावित्रीमाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेताना प्रा.ठोंबरे म्हणाले की, त्यांनी ज्योतिराव फुलेंच्या पाच व्याख्यानांचे संपादन केले तसेच त्यांचे काव्यमय चरित्र लिहून महत्त्वपूर्ण साहित्यिक योगदान दिले. कवयित्री म्हणून त्यांनी आपली प्रतिभा साकारली. विधवा व निराधार महिलांसाठी आश्रयगृह चालवून सामाजिक बांधिलकी जपली, बालकांची काळजी घेतली आणि पुण्यात विधवांच्या केशवपन प्रथेविरोधात ठाम भूमिका घेतली. महिलांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी अंधश्रद्धा, रूढी व परंपरांच्या जोखडातून बाहेर पडून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादी विचारसरणी स्वीकारण्याचे आवाहन केले. प्रबोधनाची प्रक्रिया सातत्याने सुरू राहिली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमास संस्थेच्या विविध युनिटमधील पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## आधुनिक पद्धतीने गावरान कुकुटपालनाचा यशस्वी प्रयोग

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील नायगांव तालुक्याच्या जवळच असलेल्या बेटकबिलोली येथील तरुण युवा उद्योजक श्री साईनाथ दिगंबर नकाते, श्री शिवराज नकाते, श्री साईनाथ भंडारे यांच्याकडे प्रत्येकी दहा एकर पेक्षा अधिकच क्षेत्रफळ असलेल्या जमिनी असून त्यांनी त्यात पारंपारिक व आधुनिक पिके शेवगा, टोमॅटो, काकडी दोडका, आंब्याच्या फळबाग लागवड करत शेतीला पूरक म्हणून तिघांनी आधुनिक पद्धतीने गावरान कुक्कुटपालनाची शेतीला पूरक म्हणून जोड दिली अशा दोन्ही व्यवसायाची धुरा यशस्वीपणे तिघांनी मिळून सांभाळत आहेत व्यवसायाची सुरुवात २०० गावरान कोंबड्या पासून झाली एक एकर परिसरात जाळीचे कंपाउंड वॉल उभारून मध्यभागी शेडची उभारणी केली नैसर्गिक खाद्य जसे जाग्यावरच मुरघास तयार करून त्यांना खाण्यासाठी आपल्यावर स्वच्छ परिसरात खाद्य पुरवठा केला जात आहे वेळोवेळी लसीकरण व नवजात शिशू पिल्ल्यांना स्वतंत्र संगोपनाची व्यवस्था नायगाव येथील सर्व चिकित्सालय पशुवैद्यकीय अधिकारी डॉ गौतम खिल्लारे व त्यांच्या टीम कडून तपासणी व मार्गदर्शन केले जाते त्यांच्या या नाविन्यपूर्ण आधुनिक पद्धतीने गावरान कुक्कुटपालनाची यशोगाथा तरुणांना प्रेरणादायी ठरण्यासारखी आहे त्यांचा उच्च आकांक्षी विचार पुढील वर्षापर्यंत हजारो गावरान कोंबड्यांचे उत्पन्न व विक्री करण्याचा त्यांचा संकल्प आहे त्यांच्या या उद्योग व्यवसायाने सुशिक्षित बेरोजगारांना दिशा ठरू शकेल यापूर्वी साईनाथ दिगंबर नकाते व शिवराज नकाते यांनी पारंपारिक शेतीला फाटा देत शिवराज नकाते आंबा फळबागेत आंतरपीक शेवगा लागवड करून लाखोच उत्पन्न मिळवले तर साईनाथ नकाते यांनी टोमॅटो पुनर्भारातून कमी खर्चात लाखो रुपये कमावले त्यांचा आधुनिक पद्धतीने गावरान कुकुट पालनाचा यशस्वी प्रयोग विकासाच्या वाटेवर आहे

## म.ए.सो.चे रेणावीकर विद्यालय ५३ व्या शहरस्तरीय विज्ञान गणित, पर्यावरण विषयक प्रदर्शनाचे उद्घाटन

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

म.ए. सो. चे रेणावीकर विद्यालयमध्ये ५२ व्या शहरस्तरीय विज्ञान गणित, पर्यावरण विषयक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. 'शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान' हा प्रदर्शनाचा मुख्य विषय आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष अहिल्यानगर मनपाचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी शिक्षणाधिकारी (माध्य) संध्या गायकवाड, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, आदी उपस्थित होते.

प्रारंभी विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी केले. ते म्हणाले की, शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाअंतर्गत आपण आपल्या वैज्ञानिक, गणितीय संकल्पना व पर्यावरणपूरक उपक्रमांचे सादरीकरण करू शकता व आपल्या विचारांना चालना देऊ शकता. यातून विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढेल व त्यांच्या चिकित्सक वृत्तीला वाव मिळेल. तसेच त्यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

शिक्षणाधिकारी (माध्य) सौ. संध्या गायकवाड म्हणाल्या की, आपण प्रत्येक कृती वैज्ञानिक दृष्टिकोनातून केल्यास निश्चितपणे नवनिर्मिती करू शकतो. या गणित-विज्ञान प्रदर्शनात जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी गणितीय संकल्पना, वैज्ञानिक प्रयोग, पर्यावरण संवर्धन, ऊर्जा बचत, जल व्यवस्थापन, आरोग्य व तंत्रज्ञान विषयांवरील नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व संशोधनवृत्तीचे त्यांनी विशेष कौतुक केले.बाळासाहेब बुगे म्हणाले की, विज्ञान , गणित पर्यावरण प्रदर्शन म्हणजे विचार समृद्ध करण्यासाठी शिडी आहे. तिचा वापर करीत चालावे. स्वतःमध्ये काही कमी आहे असे वाटत असल्यास स्वतः मधील त्या न्यूनत्वाला न्यूनत्त्व न मानता, संधी मानायला शिका. त्यांनी थॉमस अल्वा एडिसन या प्रसिद्ध शास्त्रज्ञाचे उदाहरण देऊन मुलांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मनपा आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, मुलांनी कृतीच्या मागे लपलेले विज्ञान शोधावे. मोबाइलचा वापर करताना त्याचा योग्य वापर करा. तंत्रज्ञान आपल्यासाठी आहे त्याचा सुयोग्य वापर आपल्याला यशाचा मार्ग दाखवितो. त्यामुळे वेळेचे नियोजन करा, मोबाईलचा वापर गरजेपुरता करा आणि भरपूर अभ्यास करून मोठे व्हा. यावेळी त्यांनी मायक्रोसॉफ्ट कंपनीचे सीईओ सत्या नडेला आणि गुगल कंपनीचे सीईओ सुंदर पीचई यांचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना सांगितले की, कामात सातत्य ठेवले आणि कृती मागील विज्ञान शोधले तर तुम्ही सुद्धा थोर शास्त्रज्ञ होऊ शकता.

यावेळी मनपा विषयतज्ञ अरुण पालवे, केंद्र समन्वयक चंद्रशेखर साठे, दादासाहेब नरवडे, समन्वयक महेश क्षीरसागर, विज्ञान संघटना अध्यक्षा सौ.काजल महांडुळे, गणित संघटना अध्यक्ष सुखदेव नागरे,सचिव शारदा होशिंग, उपाध्यक्ष विजय गरड, बाबासाहेब शिंदे, खजिनदार किशोर चाबुकस्वार, कार्यकारिणी सदस्य संदीप येणारे, श्रीमती एस.व्ही. नवले, क्रांती मुनदाणकर, दिपक शिंदे, रायकर, जालिंदर सातपुते, श्रीकांत शेलार उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती उपाध्ये यांनी केले. आभार नागरे सर यांनी मानले.



# साखर कारखान्यातील असुरक्षित पाण्याच्या हौदात पडून व्यक्तीचा मृत्यू

## शिवणी (जा),ता.लोहा ; कारखाना प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील शिवणी (जा) येथील जिरगा मारोती नगर, शेवडी (बा) रोडवर असलेल्या टवेन्टीवन शुगर्स लिमिटेड, युनिट क्रमांक ३ या साखर कारखान्याच्या हद्दीत असलेल्या असुरक्षित पाण्याच्या हौदात पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी घडली.या घटनेत खडक मांजरी (ता. लोहा) येथील रहिवासी गोविंदराव एकनाथ कापसे(वय ६०) यांचा मृत्यू झाला आहे. मृत गोविंदराव कापसे हे आपल्या असलेल्या मुलाला नाना कापसे याला भेटण्यासाठी साखर कारखान्यात गेले होते. नाना कापसे हा कारखान्याच्या यार्डमध्ये काम करत असल्याने वडील त्याला बोलण्यासाठी कारखान्यात आले होते. मात्र ते रात्रीपर्यंत घरी परतले नाहीत. दुसऱ्या दिवशीही ते घरी न आल्याने नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली. दिनांक ०१ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास कारखान्यातील कर्मचाऱ्यांना कारखान्याच्या हद्दीत असलेल्या पाण्याच्या हौदात एक मृतदेह आढळून आला. तपासणी केली असता तो मृतदेह गोविंदराव कापसे यांचा असल्याचे निष्पन्न झाले.

सदर पाण्याचा हौद अंदाजे सुमारे ८ फूट खोल व ५ फूट रुंदअसून तो पूर्णपणे जमिनीच्या पातळीवर आहे. विशेष म्हणजे या हौदाला कोणतीही संरक्षक कठडे, जाळी किंवा इतर सुरक्षा व्यवस्था नव्हती. सदर हौदाचा कोणताही वापर नसून त्यात घाण पाणी, काच, दगड टाकलेले असल्याचे दिसून येत होते. रात्रीच्या वेळी अंधारामुळे हा हौद दिसत नसल्याने चुकून त्यात पडून मृत्यू झाला असावा, असे प्रत्यक्षदर्शी नागरिकांकडून बोलले जात आहे. मात्र काही नागरिकांनी हा मृत्यू संशयास्पद असून सखोल चौकशी व्हावी, अशी मागणीही केली आहे.

घटनेनंतर परिसरात मोठी चर्चा सुरू झाली. गावातील नागरिकांनी साखर कारखान्यावर धाव घेत कारखान्याचे जनरल मॅनेजर सुभाष सुरवसे व शेतकि अधिकारी शिंदे यांची भेट घेऊन याबाबत जाब विचारला. त्यानंतर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक



नागनाथ आयलाने व पोलिस उपनिरीक्षक भोसले यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह तात्काळ रुग्णवाहिकेतून लोहा येथील शासकीय रुग्णालयात नेऊन शवविच्छेदन (झ.च.) करण्यात आले. त्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.दिनांक ०१ जानेवारी रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास खडक मांजरी येथील स्मशानभूमीत गोविंदराव कापसे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व भाऊ असा परिवार आहे. या घडलेल्या अत्यंत दुर्दैवी घटनेत शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.मनोहरजी धोंडे सरांचे ते कट्टर व निष्ठावंत चाहते ,यांच्या मृत्यूनंतर या ह्दयद्रावक घटनेने परिसरात शोककळा पसरली होती या दुःखद प्रसंगी दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या निवासस्थानी जाऊन कापसे कुटुंबियांना शिवा संघटनेच्या वतीने सांत्वन करण्यात आले.तसेच संबंधित कारखान्याचे चेअरमन व कर्मचारी यांच्याशी चर्चा करुन ,या प्रकरणात न्याय व पारदर्शक प्रक्रिया राबवण्याबाबत ठोस शब्द देण्यात आले, कुटुंबावर अन्याय होणार नाही ,यासाठी आवश्यक ती मदत व पाठपुरावा केला जाईल ,अशी ग्वाही देण्यात आली आहे.अशी ग्वाही शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरजी धोंडे सर यांनी कै. गोविंदराव कापसे यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली व धीर दिला.या प्रकरणाचा पुढील तपास बिट जमादार साखरे हे करत असून, साखर कारखान्याच्या हद्दीतील सुरक्षेअभावी घडलेल्या या घटनेमुळे कारखाना प्रशासनाच्या जबाबदारीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. अशा प्रकारच्या अपघातांना आळा घालण्यासाठी कारखान्याच्या परिसरात तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बचपन बालविद्या मंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात;चिमुकल्यांनी धरला गाण्यावर ठेका

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



केज शहरातील धारूर रोडलगतच्या बचपन बाल विद्यामंदिर चे स्नेहसंमेलन मुक्ताबाई लॉन्स मध्ये शनिवार रोजी झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, प्रमुख उपस्थिती डॉ हनुमंत सौदागर, पत्रकार रामदास तपसे,गौतम बचुटे, शरद गिराम,श्री तिडके डॉ वसुदेव नेहरकर,डॉ उमाकांत मुंडे,संजय कराड,शाम कराड, अँड उध्दव कराड, राख,बचपन बाल विद्यामंदिर चे विनायक कराड, यांच्या हस्ते उदघाटन झाले.यावेळी हनुमंत भोसले म्हणाले पालकांनी विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करावे. केजचा सांस्कृतिक वारसा जपावा असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, कला संगीत हे महत्त्वाचे आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थी घडतो असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध गीत सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. माऊली माऊली ,यांसह मराठी,हिंदी गीत ,लावणी नृत्य सादर केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षिका वैशाली कराड,ज्ञानेश्वरी सत्वधर व त्यांच्या टीम ने परिश्रम घेतले.सूत्रसंचालन श्रावणी कराड यांनीकेले.कार्यक्रमास नागरिक ,पालक,मोठया संख्येने उपस्थित होते.

## कात्री ग्रामपंचायतीला ग्रोवल्ड आदर्श ग्रामपंचायत राज्यस्तरीय पुरस्कार

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

ग्रामविकासाच्या माध्यमातून कात्री गृप ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ग्रोवल्डतर्फे ग्रामपंचायत कात्रीला 'ग्रोवल्ड आदर्श ग्रामपंचायत राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.



हा सन्मान ३ जानेवारी २०२६ रोजी ग्रोवल्ड तर्फे आयोजित कृषी प्रदर्शनात प्रदान करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या वतीने हा सन्मान लोकनियुक्त सरपंच संदिप वळवी यांनी पुरस्कार स्वीकारला. नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या हस्ते प्रदान सन्मान प्रदान करण्यात आला. कात्री गृप ग्रामपंचायतीने स्वच्छता, रोजगारनिर्मिती, कृषीपूरक उपक्रम, पायाभूत सुविधा व नागरिकांच्या सहभागातून राबविलेल्या विविध विकासात्मक कामे व यशस्वी पणे राबविलेल्या योजनांमुळे राज्यस्तरीय पातळीवर विशेष ठसा उमटविला आहे.या सन्माना बद्दल ग्रामस्थ, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असुन हा सन्मान भविष्यात चांगल्या कामासाठी प्रेरणा व सातत्याने पुढे जाण्याची जबाबदारी आहे त्यामुळे भविष्यातही कात्री ग्रामपंचायत विकासाच्या दिशेने आदर्श ठरेल, असा विश्वास सरपंच संदीप वळवी यांनी व्यक्त केला आहे.

## केतसारणी येथे कापूस प्रक्षेत्र दिन व सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील केतसारणी येथे कृषि विज्ञान केंद्र डिघोळअंबा (अंबाजोगाई) यांच्या वतीने कापूस प्रक्षेत्र दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या विशेष कापूस प्रकल्पांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अनिता पंडित सावंत यांनी अध्यक्षस्थान भूषवले. यावेळी कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ नरेंद्र जोशी, कृष्णा कर्डीले, सुहास पंके तसेच बळीराम वीर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमात सघन लागवड पद्धतीने कापूस उत्पादन वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कृष्णा कर्डीले यांनी गळफांदी छाटणी, सुधारित तंत्रांचा अवलंब, योग्य मशागत यांचे महत्व सांगत 'एक गाव – एक वाण – एक तंत्रज्ञान' या संकल्पनेचा फायदा शेतकऱ्यांना कसा होऊ शकतो यावर प्रकाश टाकला. सुहास पंके यांनी विविध शासकीय योजनांची माहिती देत महिलांनी शिक्षण, शेती व उद्योजकतेत पुढे यावे, असा संदेश दिला.

नरेंद्र जोशी यांनी फळबाग व्यवस्थापन, अद्रक पिकातील रोगनियंत्रण आणि खत व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. बळीराम वीर यांनी प्लांटरद्वारे पेरणी, यंत्राद्वारे वेचणी आणि योग्य वाण निवडीचे महत्त्व स्पष्ट केले.या प्रसंगी महिला व शेतकऱ्यांनी कापूस पिकातील वाढीव उत्पादनाचे अनुभव मांडले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महिलांनी शेती व समाजपरिवर्तनात पुढाकार घ्यावा, असा संदेश देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. उपस्थित शेतकऱ्यांनी हा कार्यक्रम मार्गदर्शक व उपयुक्त ठरल्याचे समाधान व्यक्त केले.



**धारूर नगरपरिषदेत नगरसेवक पदी निवडून आल्याबद्दल लक्ष्मण शिरसाठा यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे सत्कार करताना प्रसंगी मायकल वाघमारे, पत्रकार बालाजी जगतकर, रिपाई नेते संदीप हजारे, शाहू डोळस आदी दिसत आहेत.**

## मनविसे शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांच्या खूनप्रकरणी दोषींवर कठोर करा–हनुमान सातपुते

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**




महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष बाळासाहेब पांडुरंग सरवदे (वय ३६, रा. जोशी गल्ली, रविवार पेठ, सोलापूर) यांचा निघृण खून झाल्याच्या घटनेने राज्यभरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या अमानुष घटनेचा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. खूनप्रकरणी दोषींवर कठोर करा अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हा सचिव हनुमान सातपुते यांनी मुख्यमंत्री व पोलीस महारीक्षकांना परळी तहसील व पोलीस स्टेशन मार्फत दिलेल्या निवेदनात केली आहे.

या खूनप्रकरणातील दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी मनसे परळीच्या वतीने पोलीस स्टेशन व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात खूनप्रकरणाचा सखोल तपास करून खऱ्या आरोपींना अटक करावी, तसेच त्यांना कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर घटना समाजात भीतीचे वातावरण निर्माण करणारी असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलावीत, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता दहिवाळ, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाथरकर, ता.विठ्ठलदादा झिलमेवाड, शहर उपाध्यक्ष प्रशांत कामाळे, ऋषी बारगजे सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी स्वाती श्रीकिशन चौरे हिची राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.स्वाती श्रीकिशन चौरे हिची १४ वर्ष मुलींच्या महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली आहे.दि.२ जानेवारी २०२६ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत राज्यस्तरीय १४ वर्ष वयोगट मुलींच्या शालेय सॉफ्टबॉल स्पर्धा अंधेरी,मुंबई येथे संपन्न झाल्या.या स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाचा १४ वर्ष मुलींचा संघ सहभागी झाला होता.या संघातील कु.स्वाती श्रीकिशन चौरे हिची महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघात निवड झाली आहे.महाराष्ट्र राज्याचा संघ राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत आहे.या विद्यार्थिनीची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.अरविंद विद्यागर सर सॉफ्टबॉलचे जिल्हा क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड सर बेसबॉल चे जिल्हा क्रीडा मार्गदर्शक रेवन्नाथ शेलार सर,तालुका क्रीडा अधिकारी अनिकेत काळे सर,केज तालुका क्रीडा अधिकारी राखी यादव मॅडम,संघटनेचे अध्यक्ष श्री.दिनकर थोरात सर, बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष ड. उद्धवराव कराड सर, श्री.कापसे सर, मार्गदर्शिका डॉ.कविता कराड गित्ते मॅडम या सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री.रामदास सानप सर,श्री.तरकसे सर,कृष्णा गित्ते,केशव कराड,श्री.साखरे सर,श्री. घुले सर श्रीमती कांदे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले होते.सदर विद्यार्थिनींचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077